सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्रमांक -ससं/उशि/पुस्तक महोत्सव/२०२४/ 8274 दि. ०६/१२/२०२४

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, पुणे विभाग.
३. प्राचार्य / प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित /कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे विभाग.**

विषय - **" पुणे पुस्तक महोत्सव २०२४" या उपक्रमात सहभागी होणेबाबत..**

संदर्भ - मा. संचालक, उच्च शिक्षण, म.रा. पुणे यांचे परिपत्रक क्र. उशिसं/संकीर्ण-पुणे पुस्तक महोत्सव-२५/मवि-१/२०२४/५१६४ दि. ०६.१२.२०२४.

उपरोक्त विषयाबाबतचे मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक कृपया अवलोकनी घ्यावे.

सदर पत्रानुसार कळविण्यात येते की, राष्ट्रीय पुस्तक न्यास या भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत संस्थेच्या वतीने, पुण्यात **" पुणे पुस्तक महोत्सव २०२४"** दिनांक १४ ते २२ डिसेंबर, २०२४ या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या पटांगणावर आयोजन करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना, पालकांना, शिक्षक, प्राचार्य यांना सदर पुणे पुस्तक **महोत्सव २०२४ मध्ये सहभागी होण्यासाठी** सोबत जोडलेल्या परिपत्रानुसार प्रोत्साहीत करावे. तसेच सदर पुस्तक **महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी** आपल्या महाविद्यालयांमध्ये सूचना फलक व वर्गामध्ये ठळक प्रसिध्दी देण्यात **यावी.**

**(डॉ. अशोक उबाळे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

**सोबत - परिपत्रक.**

**प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,म.रा., पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.**

# महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,
४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्र.:उशिसं/संकीर्ण/ पुणे पुस्तक महोत्सव-२५/मवि-१/२०२४/५१६४ दिनांक- 6/12/२०२४

6 DEC 2024

प्रति,
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
पुणे विभाग, पुणे

**विषयः- " पुणे पुस्तक महोत्सव २०२४"**

**संदर्भः-** संयोजक, पुणे ग्रंथ महोत्सव यांचे पत्र क्र.पु.प.म.-१२/२४ दि.०६.१२.२०२४

उपरोक्त विषयी संदर्भांकीत पत्राची प्रत सोबत जोडली आहे, कृपया अवलोकन करावे.

सदर पत्रानुसार कळविण्यात येते की, राष्ट्रीय पुस्तक न्यास या भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत संस्थेच्या वतीने, पुण्यात " पुणे पुस्तक महोत्सव २०२४" दि. १४ ते २२ डिसेंबर २०२४ या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या पटांगणावर आयोजन करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने आपल्या अधिनस्त पुणे विभागातील विद्यापीठ व महाविद्यालयातील प्राचार्य , प्राध्यापक , विद्यार्थी व पालकवर्ग यांना उक्त संमेलनासाठी उपस्थित राहणेबाबत आपल्यास्तरावरून आहावान करण्यात यावे.

**सोबत- वरीलप्रमाणे.**

**( डॉ.शैलेंद्र देवळाणकर )**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

**प्रतः- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर.**

nbt.india
एकः सूते सकलम्

Book Your Visit...
पुणे पुस्तक महोत्सव

PUNE LIT FEST

Samarth Yuva Foundation

जा.क्र.पु.प.म-१२/२०२४

दिनांक : ०६/१२/२०२४

प्रति,

**मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर सर,**

संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे.

महोदय,

पुणे पुस्तक महोत्सव दि. १४ ते २२ डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय पुस्तक न्यास या भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत संस्थेच्या वतीने, पुण्यात **"पुणे पुस्तक महोत्सव २०२४"** फर्ग्युसन महाविद्यालयाच्या पटांगणावर भव्य पुस्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून पुणे शहराला साहित्यिक वारसा लाभला असून, येथे लेखक, विचारवंत, आणि वाचक यांचा एक सशक्त समुदाय कार्यरत आहे विविध साहित्यिक महोत्सव , ग्रंथालये आणि पुस्तक विक्री केंद्रे ही ज्ञान, सृजनशीलता आणि सांस्कृतिक चैतन्याची केंद्रे असून पुण्याच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांमुळे शहर कायमस्वरूपी साहित्याच्या प्रसारासाठी आदर्श ठरले आहे.

पुणे पुस्तक महोत्सवाच्या वेळी दि. ११/११/२०१४ रोजी दु. १२.०० ते दु. १.०० पर्यत **शांतता पुणेकर वाचत आहेत** या कार्यक्रमाचे आयोजन केले असून पुढे दि. १३/१२/२०२४ रोजी दु. १.३० ते ४.०० याबेळी **ज्ञानसरिता ग्रंथदिंडीचे आयोजन** केले आहे. तसेच दिनांक १५ डिसेंबर **२०२४ रोजी सकाळी ११ वा.** पुणे शहरातील सर्व प्रकारच्या **ग्रंथालयातील ग्रंथापालांचे एक एक संमेलन आयोजित केले आहे.** दि. १४ ते २२ डिसेंबर २०२४ **"पुणे पुस्तक महोत्सव २०२४"** **पर्यंत असणार आहे** त्यासाठी पुण्यातील आपल्या विभागाशी संलग्न असणारे महाविद्यालय आणि विद्यापीठातील प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी आणि पालक वर्ग या संमेलनासाठी येण्यासठी आहावान करावे. ही विनंती.

**{संपर्क:- श्री. आनंद काटीकर मो.९४२१६१०७०४, डॉ संजय चाकणे मो. ७०२०६७४५४५}**

**कळावे,**

आपला विश्वासू

(स्वाक्षरी)

**राजेश पांडे**

संयोजक, पुणे ग्रंथ महोत्सव

**राजेश पांडे**